॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

जा.क्र.उमवि/12/NewSyll./370/98

दिनांक :- 14.1.1998

प्रति,

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या
सर्व पदव्युत्तर कला महाविद्यालयांचे मा.प्राचार्य,

यांसी-

विषय :- एम.ए.भाग-1 इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमातील पुस्तकांबाबत.

महोदय,

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या सर्व कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयांचे मा.प्राचार्य यांना विदित आहे की, सन 1997-98 या शैक्षणिक वर्षापासून एम.ए.भाग-1 वर्गातील इंग्रजी विषयासाठी नविन सुधारित अभ्यासक्रम लागु करण्यात आलेला असुन, सदरचा सुधारित अभ्यासक्रम विद्यापीठाकडून आपणास यापूर्वीच पाठविण्यात आलेला आहे.

तसेच सदर अभ्यासक्रमानुसार पेपर क्र. EN02 – English Drama-I & II या पेपरच्या दुसऱ्या सत्रात (Term-II – English Drama-II) लेखक जॉन आर्डेन लिखित Serjeant Musgrave's Dance व पेपर क्र. EN04 (a) American Literature-I (a) and (b) च्या दुसऱ्या सत्रात (Term-II : American Literature-I (b)) लेखक जॉन स्टेनबेक लिखित Of Mice and Men ही पुस्तके अभ्यासासाठी लावण्यात आली होती. मा.विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार व मला प्राप्त झालेल्या आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, सदर पुस्तकांच्या प्रती उपलब्ध होत नसल्यामुळे त्यांचे ऐवजी पुढीलप्रमाणे नविन पुस्तके लावण्यात आली आहेत.

EN02 – English Drama-I & II

Second Term-English Drama-II

1) T.S. Eliot – Murder in the Cathedral

EN04 (a) – American Literature-I (a) and (b)

Second Term : American Literature-I (b)

1) John Steinbeck – The Grapes of Wratha.

पा.प.

करिता, सर्व पदव्युत्तर कला महाविद्यालयांचे मा.प्राचार्य यांना विनंतीपूर्वक कळविण्यात येते की, आपणाकडेस उपलब्ध असलेल्या एम.ए.भाग-१ वर्गातील इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमात वरील दुरुस्ती करण्यात यावी. व यापत्राचा आशय आपल्या महाविद्यालयातील संबंधित विषयांचे प्राध्यापक तसेच विद्यार्थी यांच्या नजरेस आणावा ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव.

प्रत माहितीसाठी सादर :-

१) मा.अधिष्ठाता, कला व ललितकला विद्याशाखा, उमवि, जळगांव.
२) मा.चेअरमन व सर्व सदस्य इंग्रजी अभ्यासमंडळ, उमवि,जळगांव.
३) मा.परीक्षा नियंत्रक, उमवि, जळगांव.
४) मा.उपकुलसचिव, परीक्षा-पूर्वार्ध विभाग,उमवि, जळगांव.
५) मा.सहा.कुलसचिव, परीक्षा-पूर्वार्ध-उत्तरार्ध विभाग, उमवि, जळगांव.
६) मा.प्रोग्रामर, संगणक विभाग, उमवि, जळगांव.